प्रबोधन
गोरेगाव

# तेरावा वार्षिक अहवाल

१९८४-८५

# प्रबोधन गोरेगाव

## १३ वी वार्षिक सर्वसाधारण सभा

प्रबोधन गोरेगाव या संस्थेची १३ वी वार्षिक सर्वसाधारण सभा शनिवार दिनांक २२ ऑगस्ट १९८६ रोजी रात्री ९ वाजता गणपती भुवन, महात्मा गांधी मार्ग, गोरेगाव (प.), मुंबई-६२ येथील संस्था कार्यालयात आयोजित करण्यात आली आहे. या सभेस सर्व सभासदांनी वेळेवर उपस्थित रहावे ही विनंती

**सभेपुढील कामकाज :**

१. प्रास्ताविक

२. सन १९८४ – ८५ चा वार्षिक अहवाल, आयव्यय पत्रक व ताळेबंद (हिशेब तपासनीसांच्या अहवालासह) वाचून मंजूर करणे

३. नवीन वर्षाकरिता (१९८५–८६) घटनेच्या कलम ७ इ प्रमाणे अध्यक्ष (१ जागा) उपाध्यक्ष (२ जागा) व कार्यकारी मंडळावरील निवृत्त झालेल्या ३ सभासदांच्या जागी नवीन सभासदांची निवड करणे. (एकूण ६ जागा)

४. नवीन वर्षाकरिता अंतर्गत हिशेब तपासनीस व सरकारमान्य हिशेब तपासनीस यांची नेमणूक करणे.

५. अध्यक्षांचे अनुमतीने सभेपुढे येणारी कामे.

कार्यकारी मंडळाच्या आज्ञेवरुन

**विजय नाडकर्णी**
कार्याध्यक्ष

**विलास देवरुखकर**
प्रमुख कार्यवाह

गोरेगाव, मुंबई–६२
दिनांक २९ जुलै १९८६

---

**विशेष सूचना :** १) संस्थेचा जमाखर्च सभासदांच्या अवलोकनार्थ गणपती भुवन, लो. टिळक नगर, रस्ता क्र. ३, गोरेगाव (प.) येथील संस्थेच्या कार्यालयात दि. १८–८-१९८६ ते १९ ८–१९८६ पर्यंत रोज रात्री ८ ते ९ पर्यंत ठेवण्यात येईल.

२) कोणाही सभासदास त्या बाबतीत काही सूचना करावयाच्या असल्यास त्या लेखी दिनांक २०–८-१९८६ पूर्वी कार्याध्यक्षांकडे सादर कराव्यात.

३) गणसंख्येच्या अभावी वरील सभा तहकूब झाल्यास, तहकूब झालेली सभा त्याच ठिकाणी अर्ध्या तासानंतर घेण्यात येईल व अशा सभेस गणसंख्येची आवश्यकता राहाणार नाही.

४) निवडणुकीस उभे राहू इच्छिणाऱ्या सभासदांनी आपले अर्ज दि. २०–८–१९८६ पूर्वी संस्था कार्यालयात रात्री ८ ते ९ या वेळेत आणून द्यावेत. अर्जाचा नमुना याच ठिकाणी उपलब्ध आहे.

# 'प्रबोधन,' गोरेगाव

## १३ वा वार्षिक अहवाल

## १९८४–८५

'प्रबोधन, गोरेगाव' या संस्थेच्या कार्याचा दि. १ जुलै १९८४ ते ३० जून १९८५ पर्यंतच्या तेराव्या वर्षाचा अहवाल व हिशेब पत्रके संस्थेच्या सर्व सन्माननीय सभासदांना सादर करतांना कार्यकारी मंडळास आनंद होत आहे.

**कार्यकारी मंडळ आणि सभा :**

या अहवाल वर्षात कार्यकारी मंडळाच्या एकूण १२ सभा घेण्यात आल्या. सभांना सरासरी १० सदस्य उपस्थित होते. स्वीकृत सभासदांसह कार्यकारी मंडळाची सभासद संख्या एकूण १८ होती.

**उपक्रम आणि कार्यक्रम :**

**राष्ट्रीय प्रज्ञाशोध परीक्षा पूर्वतयारी (B.T.S.) अभ्यासवर्ग —**

एका तपाचा काल संपल्यानंतरचे संस्थेचे हे तेराव्या वर्षातील पदार्पण. शैक्षणिक क्षेत्रात काहीतरी भरीव कार्य करून दाखविण्याच्या उमेदीने व दर वर्षी एक नवा रचनात्मक उपक्रम सुरू करण्याच्या संस्थेच्या प्रथेस अनुसरून या वर्षापासून आठवीच्या विद्यार्थ्यांसाठी 'राष्ट्रीय प्रज्ञाशोध परीक्षा' अभ्यासवर्ग ( B. T. S. ) सुरू करण्यात आले. त्यासाठी संस्थेचे कार्यकर्ते व कार्यवाह डॉ. मनोहर अदवानकर यांनी संचालित केलेले हे अभ्यासवर्ग इतर तज्ज्ञ शिक्षकांच्या मार्गदर्शनाखाली, २ डिसेंबर १९८४ पासून संस्थेच्या प्रशस्त अशा नवीन कार्यालयात सुरू करण्यात आले. या उपक्रमाचा ५० विद्यार्थ्यांस लाभ झाला. गोरेगाव व आसपासच्या उपनगरात असा कोणताही उपक्रम नसल्याने या उपक्रमाचा फायदा अंधेरी ते बोरीवलीच्या विविध शाळांतील हुशार विद्यार्थ्यांना झाला. 'नॅशनल कौन्सिल ऑफ एज्युकेशन रिसर्च अॅण्ड ट्रेनिंग (NCERT) दिल्ली' तर्फे प्रतिवर्षी घेतल्या जाणाऱ्या राष्ट्रीय प्रज्ञाशोध परीक्षेच्या पूर्वतयारीच्या दृष्टीने इयत्ता ८ वी व ९ वी मध्ये घेण्यात येणारी B. T. S. ही परीक्षा फारच उपयुक्त ठरली आहे. राष्ट्रीय प्रज्ञाशोध परीक्षा ही राष्ट्रीय पातळीवर घेण्यात येते व त्यासारख्या स्पर्धात्मक परीक्षेमध्ये मराठी मुलांचे प्रमाण फारच अल्प असते. अशा स्पर्धात्मक परीक्षेत यश संपादन करण्याचे मराठी मुलांचे प्रमाण वाढले पाहिजे ही संस्थेची भूमिका आहे.

**प्रबोधन वक्तृत्व स्पर्धा : (वर्ष १२ वे)**

सामाजिक, शैक्षणिक क्षेत्रांत काम करीत असतांना शालेय व महाविद्यालयीन विद्यार्थ्यांच्या अंगच्या कलागुणांच्या विकासास वाव मिळावा या उद्देशानेच सुरू करण्यात आलेल्या या उपक्रमाला यंदाच्या सतत्च्या बाराव्या वर्षीही भरघोस प्रतिसाद मिळाला. पुणे, दापोली रत्नागिरी, नांदेड यासारख्या दूरदूरच्या ठिकाणाहून विद्यार्थी या स्पर्धेत भाग घेण्यासाठी आले होते. दि. २३ सप्टेंबर १९८४ रोजी पाटकर महाविद्यालयातील सभागृहात या स्पर्धा अत्यंत शिस्तबद्ध व उत्साहवर्धक वातावरणात पार पडल्या.

या स्पर्धेचा बक्षिस समारंभ पाटकर महाविद्यालयाचे प्राचार्य श्री. कामत यांच्या शुभहस्ते पार पडला. आपल्या अध्यक्षीय भाषणात वक्तृत्व कलेचे महत्व विशद करून सांगतांना त्यांनी, "प्रत्येक देशाचा नेता की ज्याने समाज प्रबोधन व समाजाचे उत्थान घडवून आणले, तो एक तर लेखक तरी होता किंवा वक्ता तरी होता" असे आवर्जून सांगितले. या स्पर्धेचे परीक्षक म्हणून शालेय गटासाठी श्री. बुधवार व सौ. वैदेही सिधकर ह्यांनी तर महाविद्यालयीन गटासाठी श्री. सामंत व श्री. केणी यांनी काम पाहिले.

पारितोषिकांचे मानकरी पुढीलप्रमाणे :

**शालेय गट :**

**शिक्षणमहर्षी कै. दादासाहेब रेगे स्मृति प्रबोधन फिरता करंडक :-**

सांघिक विजेती शाळा : पार्ले टिळक विद्यालय, विलेपार्ले.

स्पर्धेत भाग घेण्यासाठी अखिल महाराष्ट्रातून स्पर्धक संस्था येत असतात व नाट्यकला जोमाने वाढीला लावण्याच्या संस्थेच्या प्रयत्नास हातभार लावत असतात हे आम्हास मोठ्या अभिमानाने नमूद करावेसे वाटते.

स्पर्धेच्या बक्षिस-वितरण समारंभात प्रमुख पाहुणे म्हणून बोलताना मराठी नाट्य परिषदेचे अध्यक्ष श्री. प्रभाकरपंत पणशीकर ह्यांनी संस्थेच्या या कार्याचा गौरव करताना, अशा स्पर्धांच्या आयोजनानेच मराठी रंगभूमीस प्रगल्भ विचारांचे नाटककार व कलाकार लाभतात व त्यामुळेच मराठी रंगभूमीच्या प्रगतीस हातभार लागतो, असे नमूद केले.

या एकांकिका स्पर्धा दि. ३१ जानेवारी ते ३ फेब्रुवारी १९८५ पर्यंत आय्. बी. पटेल शाळेचे सभागृह, गोरेगाव (पश्चिम) येथे घेण्यात आल्या. सुसज्ज नाट्यगृहाचा अभाव, आर्थिक अडचण व वेळेची मर्यादा इत्यादी तांत्रिक बाबींमुळे सर्वच इच्छुक नाट्यसंस्थांना स्पर्धेत प्रवेश देता आला नाही. या स्पर्धेत एकूण १८ एकांकिका सादर करण्यात आल्या.

**स्पर्धेचा निकाल पुढीलप्रमाणे :**

| **सर्वोत्कृष्ट एकांकिका** | एकांकिका | संस्था |
|---|---|---|
| प्रथम पारितोषिक (रोख रु. ५००/-) कै. केशवराव दाते स्मृति फिरता चषक | मेला तो देशपांडे | निनाद, गोरेगाव |
| द्वितीय पारितोषिक (रोख रु. ३००/-) | दि एस्केप | प्रयोग, मालाड |
| तृतीय पारितोषिक (रोख रु. २००/-) | भोवरा | बेस्ट नगर सन्मित्र मंडळ, गोरेगाव |

**अभिनय पुरस्कार**–प्रथम पारितोषिक (रोख रु. १००/-)

सुनील तावडे प्रयोग, मालाड

डेझी नागावकर बेस्ट नगर, सन्मित्र मंडळ, गोरेगाव

**द्वितीय पारितोषिक**–(रोख रु. ७५/-)

वसंत आंजर्लेकर निनाद, गोरेगाव

**तृतीय पारितोषिक**–(रोख रु. ५०/-)

राजेंद्र चावला प्रयोग, मालाड

**विशेष लक्षवेधी अभिनय**

संपत कदम बेस्ट नगर, सन्मित्र मंडळ, गोरेगाव

**सर्वोत्कृष्ट दिग्दर्शन**–(रोख रु. ५०/-)

विजय मोंडकर एकांकिका–मेला तो देशपांडे संस्था–निनाद, गोरेगाव

## शालांत परीक्षा व्याख्यानमाला : (वर्ष १३ वे)

यंदाची शालांत परीक्षा व्याख्यानमाला दि. ११ ते १९ फेब्रुवारी १९८५ दरम्यान आदर्श विद्यालयाच्या प्रशस्त आवारात अत्यंत शिस्तपूर्ण वातावरणात पार पडली. राष्ट्रपति पारितोषिक विजेते शिक्षक श्री. एस्. वाय्. गोडबोले व त्यांचे इतर अनुभवी शिक्षक सहकारी यांच्या मार्गदर्शनाखाली पार पडलेल्या या व्याख्यानममालेचा फायदा गोरेगावातील हजारो विद्यार्थ्यांनी घेतला. गोरेगावच्या शाळेतील शिक्षक प्रतिनिधींनी व पालकांनी प्रत्यक्ष भेटून कार्यकर्त्यांचे व्याख्यानमालेच्या आयोजनाबद्दल आभार मानले. ही एवढी एकच गोष्ट व्याख्यानमालेची उपयुक्तता सिद्ध करण्यास पुरेशी आहे.

## तेरावा वर्धापन दिन समारंभ व करमणूक कार्यक्रम :

संस्थेचा तेरावा वर्धापन दिन गुढीपाडव्याच्या शुभ मुहूर्तावर दि. २२ मार्च १९८५ रोजी संस्थेच्या कार्यालयांत साधेपणाने साजरा करण्यात आला. अतिभव्य सोहळ्याचे आयोजन रविवार दि. २४ मार्च १९८५ रोजी दीनानाथ नाट्यगृह विलेपार्ले येथे 'मुंबई सकाळ' चे संपादक श्री. आत्माराम सावंत यांच्या अध्यक्षतेखाली करण्यात आले. त्या शुभप्रसंगी संस्थेचे अध्यक्ष, प्रसिद्ध उद्योगपति व माणगाव तालुक्यातून शे. का. पक्षातर्फे निवडून आलेले नवनिर्वाचित आमदार श्री. भाईसाहेब सावंत यांचा त्यानिमित्ताने सत्कार करण्यात आला. त्या प्रसंगी

बोलतांना भाईसाहेबांनी कोणतेही काम असो, ते शिस्तबद्ध रितीने कसे करावे हे आपण प्रबोधनाच्या कार्यकर्त्यांकडून शिकलो असल्याचे प्रांजलपणाने कबूल केले व अशा संस्थेचा अध्यक्ष असल्याचा आपणास अभिमान असल्याचे सांगितले. त्या प्रसंगी बोलतांना समारंभाचे अध्यक्ष श्री. आत्माराम सावंत यांनी गरीबीतून वर आलेल्या परंतु गरीबांस न विसरलेल्या भाईना. त्यांच्या शैक्षणिक क्षेत्रांतील महत्वपूर्ण कामगिरीचा त्याचप्रमाणे प्रबोधनाच्या कार्याचा गौरव केला. या समारंभात शालांत परिक्षेत सुयश संपादन करणाऱ्या गोरेगावच्या गुणी विद्यार्थ्यांचाही रोख बक्षिसे देऊन सत्कार करण्यात आला. त्याचप्रमाणे संस्थेच्या सभासदांना 'सोयरिक' या नाटकाचा प्रयोग विनामूल्य दाखविण्यात आला.

सभासदांना करमणुकीचा एक भाग म्हणून दिनांक ७ ऑक्टोबर १९८५ रोजी दीनानाथ नाट्यगृह विलेपार्ले येथे 'वटवट सावित्री' या नाटकाचा एक प्रयोग विनामूल्य दाखविण्यात आला.

**प्रबोधन बालवाचनालय :**

आपल्या रचनात्मक कार्याचा एक भाग म्हणून प्रबोधनतर्फे गोरेगाव व मालाड येथे एकूण ५ ठिकाणी बालवाचनालये विनामूल्य चालविण्यात येतात. या वाचनालयांचा लाभ घेणाऱ्या शालेय विद्यार्थ्यांची संख्या दर वर्षी वाढत असून, मुलांवर संस्कारक्षम वयात संस्कार करणाऱ्या उत्तमोत्तम तीन हजारांहून अधिक पुस्तकांचा संग्रह या बालवाचनालयांत आहे.

**प्रबोधन बालवाडी :**

आपल्या रचनात्मक कार्याचा एक भाग असलेल्या व समाजातील आर्थिक दृष्ट्या दुर्बल असणाऱ्या घटकांना उपयुक्त असलेल्या अशा या बालवाड्या प्रबोधनतर्फे जवाहर नगर झोपडपट्टी व तीन डोंगरी झोपडपट्टी येथे विनामूल्य चालविण्यात येतात. या दोन्ही बालवाड्यांत असलेल्या १०० बालकांना पूर्वप्राथमिक स्वरुपाचे शास्त्रशुद्ध शिक्षण देण्यात येते. असे शास्त्रशुद्ध शिक्षण घेतलेल्या बालकांनी आपल्या शालेय जीवनात विशेष चमक दाखविलेली आहे. प्रबोधन बालवाडी तर्फे दिल्या जाणाऱ्या दाखल्यावर कोणत्याही सरकारमान्य शाळेत प्रवेश मिळू शकतो. अनेकांनी प्रत्यक्ष भेटून त्यांच्या विभागात बालवाडी सुरू करण्यासंबंधी विनंती केलेली असून निरनिराळ्या विभागांत बालवाड्या लवकरच सुरू करण्याचा संस्थेचा मनोदय आहे.

**धन्यवाद :**

संस्थेच्या प्रत्येक कार्यात असंख्य हितचिंतकांचा. सभासदांचा व कार्यकर्त्यांचा सिंहाचा वाटा आहे. पत्रकार मित्र त्याचप्रमाणे इतर सेवाभावी संस्था ह्यांनी केलेल्या सक्रीय सहकार्यामुळेच संस्थेस येथवर वाटचाल करणे शक्य झाले आहे. संस्थेचे सरकारमान्य हिशेब तपासनीस मेसर्स एस्. एस्. नायक आणि कं. व अंतर्गत हिशेब तपासनीस श्री. रामचंद्र जोशी यांनी केलेले बहुमोल मार्गदर्शन व सहकार्याबद्दल संस्था त्यांची अत्यंत ऋणी आहे. बृहन्मुंबई महानगरपालिकेने यावर्षी संस्थेला रु. ३०,०००/- चे अनुदान दिले. या उदार मदतीबद्दल संस्था महापालिकेची व अनुदान समितीवरील नगरसेवक सदस्यांची अत्यंत ऋणी आहे. त्यांचप्रमाणे प्रबोधन क्रीडामहोत्सवासाठी निरलॉन्, रिलायन्स्, एक्स्ट्रुशन प्रोसेस व हॉटेल प्रीतम या उद्योग समूहांनी केलेल्या उदार मदतीबद्दल त्यांचीही संस्था अत्यंत ऋणी आहे. ह्यापुढेदेखील सर्व संबंधितांचा लोभ सदैव असाच कायम राहील असा विश्वास आम्ही व्यक्त करीत आहोत.

आपले नम्र,

**कार्यकारी मंडळ (१९८४-८५)**

प्रबोधन, गोरेगाव

# प्रबोधन गोरेगाव

संस्था नोंदणी कायदा १८६० अन्वये नोंदलेली संस्था [Regn. No. Bom. 46/72 GB BSD]

मुंबई सार्वजनिक विश्वस्त व्यवस्था अधिनियम १९५० अन्वये नोंदलेली संस्था [Regn. No. F 2502 Bom.]

( १९८४-८५ )

अध्यक्ष : आमदार श्री. निळकंठ ज. सावंत

उपाध्यक्ष : श्री. प्रभाकर ज. मोहक डी.एम.अी.डी.अी.ओ.

श्री. शरद गुप्ते बी. ए.

-: कार्यकारी मंडळ :-

कार्याध्यक्ष : श्री. विजय नाडकर्णी बी. ई. [ऑ.] सिव्हील

प्रमुख कार्यवाह : ,, विलास देवरुखकर बी. एस्सी. [ऑ.]

सह कार्यवाह : डॉ. मनोहर अदवानकर एम्. एस्सी., पी. एच. डी.

श्री. सुरेश चव्हाण बी. ए.

कोषाध्यक्ष : ,, महादेव खानोलकर

-: सभासद :-

श्री. वसंत तावडे बी. ए.
,, सुरेश सैतवडेकर
,, गणपतराव सारंग जी.डी.आर्ट
,, दिलीप साळवी बी.एस्सी. [ऑ.]
,, सुरेश माईणकर
,, पदमाकर देसाई बी.एस्सी. [ऑ.]
,, नितीन शिंदे

श्री. सुभाष देसाई
,, दिनकर मालवणकर
,, चंद्रकांत ज. सावंत
,, गिरिश देसाई बी. ई.
,, श्रीनिवास शिरसेकर जी.डी.आर्ट
ॲड विकास रेळे बी.ए.एल.एल.बी.

अंतर्गत हिशेब तपासनीस

श्री रामचंद्र जोशी बी. ए.

सनदी लेखापाल

मे. एस. एस. नायक आणि कं


कार्यालय :
गणपती भुवन, लोकमान्य टिळक नगर मार्ग क्र. ३,
महात्मा गांधी मार्ग, गोरेगाव [प.],
मुंबई-४०० ०६२.

संपर्क :
रंगसेवा
फिल्मिस्तान जवळ, स्वा. वि. मार्ग,
गोरेगाव [प.], मुंबई-४०० ०६२.
दूरध्वनी : ६७२ ४१ ५७